VOL- VIII ISSUE- IV APRIL 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# बालक व महिलांचे मानवी हक्क

प्रा.डॉ.नितीन जाधव
सहाय्यक प्राध्यापक (राज्यशास्त्र)
जी.एम.डी.महाविद्यालय,
सिन्नर.जि.नाशिक.
Email- jadhavnitin1983@rediffmail.com

**प्रस्तावना :-**

मानवी जीवनात स्व:विकासासाठी हक्कांची गरज प्रत्येकास असते. प्रामुख्याने बालक व महिला हे दोन घटकांच्या हक्काची परिस्थिती स्थळ परत्वे गंभीर आहे. मानवी हक्क व्यक्तीला पोषक वातावरण प्राप्त करून देतात. याच संदर्भाने "व्यक्तीच्या आंतरिक -सर्वांगीण विकासासाठी व्यक्तीने समाज व शासनाकडे केलेल्या न्याय्य मागण्या व समाजाकडून राज्य व कायदा या संकल्पनांचा आधार घेत त्यांना दिलेला न्याय, म्हणजे "मानवी हक्क' होय" भारतीय संविधान आधारे ज्यांची अंमलबजावणी भारतीय न्यायालये करु शकतात, असे सर्व अधिकार म्हणजे मानवी हक्क होत. ग्रीक व रोमन विचारवंतांच्या तसेच ख्रिस्ती तत्त्वज्ञानात आणि टॉमस अक्वायनससारख्या विधिज्ञांच्या लिखाणातून मांडली गेल्याचे दिसते.२०११ च्या जनगणनेनुसार भारताच्या एकूण लोकसंख्ये मध्ये महिलांची संख्या ४८.४६% आहे. पुरुष, महिला व बालक हे समाज व्यवस्थेचे प्रमुख घटक आहेत. समाज व कुटुंब व्यवस्थेच्या संतुलनासाठी या घटकांची भूमिका परस्परांना पूरक स्वरुपाची आहे. मात्र, आपली समाज व्यवस्था पुरुषप्रधान असल्याने लोकशाही व्यवस्थेच्या स्वीकारा नंतरही समाजात विषमता दिसून येतेच तरीही आज महिलांना व बालक यांना हक्क मिळताना भेदभाव होताना दिसू येतो. दरहजारी पुरुषांमागे स्त्रियांचे घटते प्रमाण, स्त्री शिक्षणा बाबतची उदासीनता, स्त्रियांवरील व बालकांवरील अत्याचारात होत असलेली वाढ, निर्णय प्रक्रियेत स्त्रियांना नगण्य स्थान इत्यादी बाबी स्त्रीचा माणूस म्हणून स्थानातील गौणत्वाचे निर्देशक म्हणावे लागतील. मानवी समाजात स्त्रियांची संख्या जवळ पास ५० टक्के आहे. असे असले तरी सर्वच क्षेत्रात त्यांना तेवढे प्रतिनिधित्व देण्यात आलेले नाही. प्रस्तुत शोधनिबंधात बालक व महिलांच्या हक्कांच्या संदर्भात मानवी हक्कांच्या प्रश्नांचा आढावा घेण्यात आला आहे.

**अभ्यासाचे उददेश :-**

1. भारतातील बालकांच्या मानवी हक्क प्रश्नांचा अभ्यास करणे.
2. भारतातील महिलांच्या मानवी हक्क प्रश्नाचा अभ्यास करणे.
3. बालक व महिलांच्या मानवी हक्कांच्या परिस्थितीचा विश्लेषणात्मक आढावा घेणे.

**गृहीतकृत्ये :-**

1. भारतातील बालकांच्या मानवी हक्क प्रश्न गंभीर असल्याचे दिसून येते.
2. भारतातील महिलांच्या मानवी हक्क प्रश्न गंभीर असल्याचे दिसून येते.

**संशोधन पद्धत्ती** :-

उपलब्ध माहितीच्या आधारे विषयाची मांडणी करण्यासाठी वर्णनात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत लघुशोध निबंधासाठी द्वितीयक तथ्य सामग्रीचा आधार घेण्यात आला आहे. समाजातील अज्ञानामुळे बालक व महिलांना हक्का बाबत जाण नसते. विषमतेमुळे स्त्रियांच्या व बालकांच्या हक्कांचा प्रश्न जाणून बुजून दुर्लक्षित केला जातो. म्हणूनच भारतातील मानवी हक्क आणि स्त्रियांच्या व बालकांच्या हक्कांच्या प्रश्नांचा अभ्यास करणे, बालक व महिलांच्या मानवी हक्कांच्या परिस्थितीचा विश्लेषणात्मक आढावा घेणे या संदर्भात अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत लघुशोध निबंधासाठी द्वितीयक तथ्य सामुग्रीचा आधार घेऊन निष्कर्ष पर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**बालकांचे मानवी हक्कांचे विश्लेषण:**

लहान वयातच हक्कांची गरज माणसाला निर्माण होते. बालकांचा सर्वांगीण विकास साधून त्यांना सुखी व समृद्ध जीवन उपलब्ध व्हावे, तसेच प्रत्येक मनुष्य हा सर्व हक्क व स्वातंत्र्ये मिळविण्यास पात्र आहे.मग त्या बाबतीत जात, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, राजकीय वा अन्य मतप्रणाली, राष्ट्रीय वा सामाजिक उत्पत्ती, मालमत्ता, जन्म वा अन्य दर्जा ह्यांचा विचार केला जाणार नाही.शारीरिक वा मानसिक अपरिपक्वतेमुळे बालकाची अधिक काळजी व संगोपन करावे लागते; त्याचप्रमाणे त्याला कायद्यान्वये संरक्षणही द्यावे लागते.प्रत्येक जन्मजात बालकास जन्मसिद्ध अधिकार व हक्क प्राप्त करून देणारे कायदे प्रगत राष्ट्रांनी वेळोवेळी केल्याचे दिसून येते.१९४६ मध्ये स्थापन करण्यात आलेली 'संयुक्त राष्ट्रे बालक निधी' हि संस्था स्थापन झाली.

भारतात देखील बालकांच्या हक्कांचा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. भारतामध्ये बालकांसंबधी अनेक कायदे अस्तित्वात आहेत. १९७४ साली "राष्ट्रीय बाल धोरण "जाहीर करण्यात आले होते.त्या आधारावर महाराष्ट्रात बालकांचे हक्क अबाधित राखण्यासाठी महाराष्ट्र शासनाने २००२ साली, बाल विकास धोरण निश्चित केले .आंतरराष्ट्रीय बाल हक्क परिषदेने सुचविलेले बालकांचे हक्क व अधिकार आणि त्या अनुषंगाने करावयाच्या तरतुदी विचारात घेऊन महाराष्ट्राचे पहिले बाल विकास धोरण तयार करण्यात आले .बालकांच्या विकासासाठी,

रचनाबद्ध, सर्वकष व नियोजित विकास साधण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न राहील अशी आशा ह्या धोरणाची संकल्पना होती . महाराष्ट्रातही बालकामगारांचे प्रश्न, मोठ्या प्रमाणवर असणारी स्थलांतराची लोकसंख्या, सहा वर्षांखालील मुलांचे कुपोषण, कमी होणारे लिंग गुणोत्तर, महाराष्ट्राबरोबरच इतर राज्यांमध्ये आणि देशामध्ये वाढत जाणारे अवैध्य व अनैतिक मानवी व्यापाराचे प्रमाण, बालकांना पळवून नेणे याबरोबरच बालकांविरुद्धच्या गुन्ह्यांमध्ये धक्कादायक प्रमाणात वाढ, लैंगिक शोषण, बाल भिक्षेकरी आणि अनाथाची उपेक्षा व पिळवणूक यांसारखे विषय राज्य आणि सर्वांसाठीच अतिशय चिंतेचे आहेत

**महिलांच्या मानवी हक्कांचे विश्लेषण:**

महिलांना सर्वांगीण विकासासाठी हक्कांची गरज असते. भारतीय समाज पुरुषप्रधान असल्याने स्त्रियांना गौण स्थान असल्याचे वारंवार दिसून येते यासाठी भारतीय घटनेच्या कलम १४ नुसार कायद्यापुढे सर्व नागरिक समान असतील अशी तरतूद करण्यात आली आहे. स्त्रियांच्या बाबतीत ज्या चालीरीती, परंपरा निर्माण केल्या त्या विषमतेवर आधारित आहेत. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाद्वारे स्त्रियांच्या परिस्थिती बाबत जागरुकता आणण्यासाठी अनेक प्रयत्न झाले त्यास राज्यघटनेतील मुलभूत हक्क व मार्गदर्शक तत्वे यांच्या द्वारे पाठबळ मिळाले. राज्यघटनेच्या कलम १५ द्वारे भेदभाव नष्ट करण्याची तरतूद करण्यात आली. तसेच कलम १६ द्वारे समान संधी संबंधी तरतूद करण्यात आली. राज्यघटनेतील या तरतुदी मुळे स्त्रियांना हक्क प्राप्त करून देण्याचा प्रत्यत्न करण्यात आलेला असला तरी सद्य स्थितीत स्त्रियांच्या हक्कांचा प्रश्न ऐरणीवर आलेला दिसून येतो. मागील काही वर्षात शासकीय स्तरावर लिंगभेद नष्ट करण्यासाठी व स्त्रियांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी स्त्री सबलीकरणाची धोरणे निश्चित करण्यात आलेली असली तरी प्रत्यक्ष वस्तुस्थिती व भारतीय समाज व्यवस्थेचे चित्रण वेगळेच असल्याचे स्पष्ट होते.

कित्येक शतके स्त्रियांना रूढी, परंपरा, धर्माचे नियम यामुळे दुय्यमत्व सहन करावे लागत आहे. स्वतंत्र्या नंतर भारतातील न्याय व्यवस्था सामाजिक न्याय देण्यात जो विलंब लावते त्यामुळे एखाद्या स्त्रीला लग्ना नंतर हुंड्या वरून वाद निर्माण झाल्यास १० ते १५ वर्ष कोर्ट कचेरीत चक्कर मारत न्यायसाठी प्रतीक्षा करावी लागते. या वरून एकच स्पष्ट होते कि न्याय दानसाठी जो विलंब लागतो त्यात स्त्रियांचे अर्धे जीवन नष्ट होते. भारतात मुलगा जन्मास आला कि आनंद उत्सव साजरा केला जातो. या उलट मुलगी जन्मास आल्यावर दुख होते कधी कधी मुलीची गर्भातच हत्या देखील केली जायची. भारतात एकूण लोकसंख्या भरमसाट प्रमाणात वाढत आहे. त्यात पुरुषांच्या तुलनेने स्त्रियांचे प्रमाण घटत आहे.

**भारतातील महिला-पुरुष प्रमाण सारणी**

| अ. क्र | वर्ष | दर हजार पुरुष मागे स्त्रियांचे प्रमाण |
|---|---|---|
| १ | १९९१ | ९२७ |
| २ | २००१ | ९३३ |
| ३ | २०११ | ९४३ |

संदर्भ : http://www.census2011.co.in

वरील आकडेवारी वरून असे स्पष्ट होते कि, १९९१ ला दर हजार पुरुष मागे स्त्रियांचे प्रमाण ९२७ होते, २००१ ला दर हजार पुरुष मागे स्त्रियांचे प्रमाण ९३३ होते, २०११ ला दर हजार पुरुष मागे स्त्रियांचे प्रमाण ९४३ होते, या वरून असे स्पष्ट होते कि, पुरुषांच्या तुलनेने स्त्रियांचे प्रमाण चिंताजनक आहे.

२१ व्या शतकात प्रवेश करून १६ वर्ष झाली तरी स्त्रियांच्या समस्या मध्ये फार मोठा बदल झालेला आढळून येत नाही. स्त्रियांना आजही अनेक रूढी, परंपरा व प्रथांद्वारे समस्यांना सामोरे जावे लागत आहे. त्यात गर्भजल चिकित्सा, स्त्रि अर्भक हत्या, एकतर्फी प्रेमातून मुलीवरील अत्याचार आशा नवीन समस्यांना सामोरे जावे लागत आहे.

**मानवी अधिकाराचा जागतिक जाहीरनामा**

संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने १० डिसेंबर रोजी मानवाधिकाराचे वैश्विक घोषणापत्र पॅरिस येथे स्वीकारलेले घोषणापत्र आहे .हे घोषणापत्र दुसऱ्या महायुद्धात जगाने अनुभवलेल्या नृशंस अत्याचारांचा परिणाम म्हणून अस्तित्वात आले .यात एकूण ३० कलमे असून त्यांचा सविस्तर अर्थ नंतर झालेल्या अनेक जागतिक करारांमधून, राष्ट्रीय घटना आणि कायदे यातून आणि स्थानिक मानवाधिकार संघटनांकडून लावण्यात आला आहे .१९७६ मध्ये पुरेशा सदस्य राष्ट्रांच्या पाठिंब्यानंतर त्यास आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप प्राप्त झाले .

**निष्कर्ष:**

१. भारतीय राज्यघटनेने स्त्रियांना व बालकांना समता मिळावी म्हणून तरतूद करण्यात आलेली असली तरी स्त्रियांना अजूनही दुय्यम स्थान असल्याचे स्पष्ट होते.
२. काही बालकांना आजही शिक्षण घेण्याच्या वयात जोखमीच्या ठिकाणी काम करावे लागते.
३. भारतातील जनगणनेवरून पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे प्रमाण घटत असल्याचे दिसून येते.
४. स्त्रियां व बालकांवरील अत्याचार दिवसेंदिवस वाढतच आहे असे दिसून येते.
५. स्त्रियांना आजही अनेक रूढी, परंपरा व प्रथांद्वारे समस्यांना सामोरे जावे लागत आहे.
६. स्त्रियां व बालकासाठी प्रत्येक देशात हक्क देण्यात आलेले असले तरी हक्कांसाठी त्यांना संघर्ष करावा लागत आहे.

**समारोप :-**

स्त्रियां व बालका हे समाजाचे दोन मुख्य घटक आहेत. स्वातंत्र्यानंतर भारतीय राज्यघटनेच्या तिसऱ्या भागात नागरिकांच्या मुलभूत हक्कांचे स्पष्टीकरण कलम १२ ते ३५ दरम्यान नमूद करण्यात आलेले आहे. कलम १२ ते ३५ दरम्यान हक्क देऊनही स्त्रियां व बालकाच्या मुलभूत हक्कांचे रक्षण होताना दिसून

VOL- VIII ISSUE- IV APRIL 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

येत नाही हि खेदाची बाब आहे. कायद्यापुढे समानता, धर्म, वंश, लिंग किंवा जन्मस्थान या कारणावरून भेदभाव करण्यास मनाई आहे. समान संधी, शिक्षणाचा हक्क, वेठबिगारी पासून मुक्तता, घटनात्मक उपाय वापरून हक्कांची मागणी करण्याचा अधिकार आशा मुलभूत हक्कांचा समावेश भारतीय राज्यघटनेत आहे. मात्र प्रत्यक्षात स्त्रियां व बालकांच्या विविध हक्कांचा प्रश्न, सातत्याने गंभीर होत चालला आहे. म्हणून १९७३ साली मानवी हक्क अधिनियम अमलात आणलेला आहे. त्या नुसार मानवी हक्क आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. असे असून सुद्धा त्यांच्या हक्कांचे प्रश्न ऐरणीवर येत आहे. तसेच भारतीय राज्यघटनेनुसार दिलेले सर्व अधिकार ज्यामध्ये स्त्रियांना भेदभाव मुक्त जीवन जगण्याचा हक्क, वेश्या वस्तीतील स्त्रियांचे हक्क व भिन्न धर्मीय विवाह केल्यामुळे होणारा छळ, लिंग आधारित विषमता, महिला आत्महत्या आशा सर्व महिला हक्कांची अंमलबजावणी विधायक दृष्टीकोनातून झाल्यास लिंगभेदाचा प्रश्नाचा अंत होईल व महिलांच्या हक्कांचे हनन होणार नाही.

**संदर्भ ग्रंथ :-**

१. धनंजय कीर, महात्मा जोतीराव फुले, पॉप्यूलर प्रकाशन, ,मुंबई, १९६८.
२. आर. एस. साळुंखे, शिक्षण व महिलांचे सबलीकरण, योजना मासिक, सप्टेंबर २००५.
३. जोशी स्मिता, भारतीय संविधान व राजकारण आणि कायदा, पिअरसन प्रकाशन, दिल्ली, २०१३.
४. राजेंद्र होरा व सुहास पळशीकर, राज्यशास्त्र कोश, दास्ताने रामचंद्र आणि कंपनी, पुणे, १९८७.
५. गाटे शुभांगी, महिला सबलीकरण स्वरूप व समस्या, वरद प्रकाशन, औरंगाबाद, २००४.
६. भोले भा. ल., भारताचे शासन आणि राजकारण, पिंपलपुरे आणि कंपनी, तिसरी आवृत्ती, नागपूर, २००८.
७. पाटील व्ही. बी., भारतीय राज्यव्यवस्था, के सागर प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, २००८.
८. सुधीर बोधनकर व अलोणी, सामाजिक संशोधन, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २००७.
९. http://www.census2011